## सन १८५२ चा मुंबई अधिनियम ११

## मुंबईचा जमीन महसूल माफ असलेल्या इस्टेटीबाबत अधिनियम, १८५२

[ १३ फेब्रुवारी १८५२ ]

हा अधिनियम पुढील अधिनियमान्वये अंशतः निरसित करण्यात आला आहे :—

सन १८७५ चा मुंबई अधिनियम १६.

सन १८७६ चा मुंबई अधिनियम १०.

सन १८९४ चा मुंबई अधिनियम ४.

ह्या अधिनियमात भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

ह्या अधिनियमात विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

**मुंबई इलाख्यातील अंशतः किंवा संपूर्ण माफी आहे असा दावा असलेल्या विवक्षित इस्टेटींच्या स्वामित्वाबाबत निवाडा देण्यासंबंधी अधिनियम.**

ज्याअर्थी दख्खन, खानदेश व दक्षिण मराठा प्रदेशात व मुंबई इलाख्यास अगदी अलीकडे जोडण्यात उद्देशिका आलेल्या इतर जिल्ह्यांत, जमीन महसुलाची अंशतः व संपूर्ण माफी असलेली इनामे व इतर इस्टेटी याबाबत सरकार विरुध्द केलेले दावे ह्यांची दखल [२]दिवाणी न्यायालयांना घेता येत नाही. २****;

**आणि ज्याअर्थी उक्त दाव्यांचा विलंब न लावता न्यायचौकशी करणे व निकाल लावणे योग्य आहे; त्याअर्थी, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—**

१. हे कलम, सन १८९४ चा मुंबई अधिनियम ४ या अन्वये निरसित करण्यात आले. [ विवक्षित जिल्ह्यांना नियम लागू नसणे. ]

---

१. हा अधिनियम लागू असण्यासंबंधात पहा, मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ (१८७९ चा मुंबई ५) कलम १२७, सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ द्वारे संक्षिप्त नाव देण्यात आले.

२. निरसन व सुधारणा अधिनियम, १८९४ (१८९४ चा ४) याद्वारे, हा मजकूर निरसित करण्यात आला.

इनाम कमिशनर, सहाय्यक व नोकरवर्ग यांची नेमणूक करण्याचा अधिकार.

२. [1][[2](राज्य) सरकारला] सन १८२७ चा [3]*** विनियम २८[4] याअन्वये सरकारच्या सामान्य विनियमाखाली न आणलेल्या मुंबई इलाख्याच्या अंमलात येत असलेल्या कोणत्याही जिल्ह्यासाठी किंवा प्रदेशाच्या कोणत्याही भागासाठी, इनाम कमिशनर याची या ठिकाणी नंतर उल्लेख करण्यात आलेल्या कारणांसाठी आवश्यक वाटतील इतके सहाय्यक यांची व अधीन नोकरगांची नेमणूक करता येईल.

कर्तव्ये कशी पार पाडण्यात येतील ते.

३. प्रत्येक इनाम कमिशनर व त्यांचे सहाय्यक यांची कर्तव्ये ही, ह्या अधिनियमास जोडण्यात आलेल्या अनुसूचीतील नियमांना अनुसरून पार पाडण्यात येतील.

माफी मिळविण्यासाठी दावेदारांचे स्वामित्व ठरविणे.

४. जमिनी व त्यातील हितसंबंध याबाबत दाव्यांचा निवाडा करताना, दावेदारांचा मालकी हक्क हा, ह्या अधिनियमास जोडण्यात आलेल्या अनुसूची (ब) मधील नियमांप्रमाणे ठरविण्यात येईल.

साक्षीदारांस हजर राहण्यास भाग पाडणे, साक्ष घेणे इत्यादी बाबत अधिकार.

५. साक्षीदारांस हजर राहण्यास भाग पाडण्यासाठी व साक्ष घेण्यासाठी सर्वसामान्य दिवाणी न्यायालयामध्ये विधिअन्वये जे प्राधिकार निहित असतील किंवा जे अधिकार त्यांना वेळोवेळी देण्यात येतील, तेच प्राधिकार प्रत्येक इनाम कमिशनर व त्यांचे सहाय्यक यांस असतील आणि उक्त अधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याने दखल घेतलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधांत पुरावा न देणे, खोटी साक्ष देणे आणि आदेशिकांचा विरोध करणे व तत्सम इतर गोष्टी याबाबत शिक्षा करण्याचा संबंध असेल तेथवर, त्याचे कार्यालय हे, ज्या जिल्ह्यांत ते वेळोवेळी स्थापन करण्यात येईल त्या जिल्ह्यातील वरिष्ठ दिवाणी न्यायालयाच्या अधिकाराचे क्षेत्राधिकार असणारे दिवाणी न्यायालय असल्याचे समजण्यात येईल.

कमिशनर व सहाय्यक यांच्या कामकाजाविरुध्द तक्रारी व त्यावर अपिले.

परंतु या कलमान्वये अनुक्रमे इनाम कमिशनर किंवा त्यांचे कोणतेही सहाय्यक यांना नेमून दिलेल्या प्राधिकारांचा वापर करताना, त्याच्या कामकाजाविरुध्द करावयाच्या सर्व तक्रारी ह्या किंवा त्यांच्या कामकाजांविरुध्द करावयाची अपिले ही ह्या अधिनियमास जोडलेल्या अनुसूची (अ) च्या दुसऱ्या नियमाप्रमाणे करण्यात येतील व त्यात निर्दिष्ट करण्यात आलेल्या पद्धतीशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने व निर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याशिवाय इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून त्याची दखल घेतली जाणार नाही.

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे, मूळ "सरकारच्या" या मजकुराऐवजी "प्रातिक सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रातिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. निरसन व सुधारणा अधिनियम, १८९४ (१८९४ चा ४) वाद्वारे "उक्त" हा मजकूर निरक्षित करण्यात आला.

४. निरसन अधिनियम, १८७३ (१८७३ चा १२) याद्वारे १८२७ चा मुंबई नोंदणी २८ हा मजकूर निरसित करण्यात आला.

६. इनाम कमिशनरच्या नोकरवर्गाशी संबंध असलेल्या किंवा हया अधिनियमाच्या तरतुदींन्वये कमिशननवर तात्पुरत्यारीत्या नोकरीवर ठेवलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून करण्यात आलेली लाचलुचपतीची, जुलमाने बक्षीस घेण्याची व सामान्यपणे गैरवर्तणुकीची सर्व कृत्ये किंवा अधिकारांचा दुरुपयोग करणे ही कृत्ये त्यांसाठी दंड बसविण्यासह फौजदारी गुन्हे म्हणून शिक्षेस पात्र ठरतील व त्यांसाठी पाच वर्षांपेक्षा अधिक असेल अशा मुदतीसाठी काम न देता साध्या कैदेची शिक्षा देण्यात येऊ शकेल ; कमिशनवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या गैरवर्तणुकीबद्दल शिक्षा.

आणि ज्या कोणत्याही व्यक्तीकडून किंवा ज्या व्यक्तीच्या वतीने त्यास अधिकृतरीत्या कामावर ठेवण्यात आले असेल त्या कोणत्याही इसमाकडून अशा कोणत्याही अधिकाऱ्यांने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या स्वीकारलेले बक्षीस हे जुलमाने घेतले असल्याचे समजण्यात येईल. जुलमाने बक्षीस घेणे या संज्ञेची व्याख्या.

आणि ह्या दंडाअन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही शास्तीमुळे किंवा शिक्षेमुळे, अपराधीवर इतर जो कोणत्याही दिवाणी खटला चालविण्यात येऊ शकतो, तो खटला चालविण्यास बाध येतो असे समजले जाणार नाही. इतर खटला चालविण्यावर निर्बंध नसणे.

७. हे कलम सन १८७६ चा मुंबई अधिनियम १० या अन्वये निरक्षित करण्यात आले. [ न्यायालयाच्या क्षेत्रधिकांरास प्रतिबंध ]

## अनुसूची " अ "

### प्रत्येक इनाम कमिशनर आणि त्याचे सहायक यांची कर्तव्य ठरविण्याबाबत नियम

**१. कर्तव्य ठरविणे.–** ह्या अधिनियमितीन्वये विहित करण्यात आलेल्या रीतीने इनामे किंवा जहागिऱ्या यांचा ताबा धारण करीत असलेल्या किंवा त्यांचा उपभोग करीत असलेल्या किंवा त्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तींच्या स्वामित्वाची व त्यांनी इनामे व जहागिऱ्या यांचा ताबा व उपभोग घेण्याबाबत सरकारविरुध्द केलेल्या दाव्यांची व जमीन महसूलाच्या माफीबाबत त्यांनी केलेल्या दाव्यांची चौकशी करणे व ज्या सर्व गोष्टींसाठी ह्या अधिनियमितीमध्ये विशेषकरून तरतूद करण्यात आली नसेल, त्या सर्व गोष्टी करण्यासाठी सामान्यपणे[१] [ [२](राज्य) सरकारच्या ] सूचनेप्रमाणे कृती करणे, हे इनाम कमिशनर व त्याचे सहाय्यक यांचे कर्तव्य असेल.

---

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याद्वारे, मूळ मजकुराऐवजी " प्रांतिक सरकार " हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूल आदेश, १९५० याद्वारे " प्रांतिक " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२. सहायक कमिशनर व कमिशनर यांच्या आदेशावर अपील.—** सहायक कमिशनरांच्या सर्व आदेशांवर इनाम कमिशनरकडे अपील करता येईल आणि इनाम कमिशनरला त्याचे आदेश व कामकाज यांची आवश्यकता असल्यास, फेरतपासणी, त्यांची सुधारणा करण्याचा किंवा ते बदलण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार देखील असेल आणि त्या सारख्याच रीतीने इनाम कमिशनर यांचे आदेश व कामकाज यावर [1][ भारत शासन अधिनियम, १९३५ याच्या कलम २९६ (२) अन्वये रचना करण्यात आलेल्या न्यायाधिकरणाकडे ] अपील करता येईल आणि उक्त न्यायाधिकरणास त्याचे आदेश व कामकाज यात फेरफार करता येईल, ते फिरविता येईल किंवा रद्द करता येईल आणि [2][ उक्त न्यायाधिकरणाचे आदेश ] प्रत्येक प्रकरणामध्ये अंतिम असतील.

**३. हक्कांची विवरणपत्रके स्वीकारण्याचे व विवरणपत्रकांच्या समर्थनार्थ असलेला पुरावा नोंदविण्याचे कर्तव्य.—** इनाम कमिशनर किंवा त्याचे सहायक हे जमीन महसूल देण्याची माफी असलेल्या जमिनी धारण करणाऱ्या अथवा अशा जमिनी किंवा त्यामधील कोणताही हितसंबंध धारण करण्याचा दावा सांगणाऱ्या व्यक्तींकडून, ज्याअन्वये जमिनी किंवा त्यामधील हितसंबंध अशा रीतीने धारण करण्यात आले आहेत त्या हक्काच्या स्वरूपासंबंधी खुलासा असलेली विवरणपत्रके स्वीकारतील आणि अशा विवरणपत्रकांच्या समर्थनाचे दिलेला पुरावा घेतील व नोंदवितील.

**४. विवरणपत्रके कशी स्वीकारण्यात येतील.—** ही विवरण पत्रके इनाम कमिशनच्या अधिकाऱ्याकडून प्रत्यक्ष किंवा अशा रीतीने धारण केलेली जमीन किंवा हितसंबंध किंवा माफ असण्याचा दावा सांगितलेली जमीन ज्या तालुक्यात असेल किंवा जो मालक आहे असे सांगण्यात येते, अशी व्यक्ती ज्या तालुक्यात राहत असेल त्या तालुक्याच्या महसूल प्राधिकाऱ्यामार्फत एका सामान्य विनंती व्यतिरिक्त इतर कोणतीही आधी करावयाच्या पद्धतीवजा कामकाज न करता स्वीकारता येतील. अशी सामान्य विनंती ही, वर सागितल्याप्रमाणे ज्यांच्याकडून माफ असलेल्या जमिनी धारण करण्यात येतील किंवा त्या धारण करण्यात येत असल्याचा दावा सांगण्यात येईल अशा जिल्ह्यातील जमीनदारांस त्यांनी आपल्या हक्काचे स्वरूप निर्दिष्ट करण्याविषयी असेल.

**५. नोटीस केव्हा काढावी.—** परंतु अशा सामान्य विनंतीकडे पुरेसे लक्ष पुरविण्यात आले नसेल, तेव्हा वर सांगितल्याप्रमाणे संपूर्णतः किंवा अंशतः माफ असलेल्या कोणत्याही जमिनी किंवा त्यामधील हितसंबंध धारण करणाऱ्या किंवा धारण करीत असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही पक्षकारास नोटीस काढण्याचा अधिकार आहे व अशा नोटीशी-अन्वये त्यास जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत आपला हक्क दर्शविण्यास फर्माविण्याचा अधिकार आहे.

---

१. वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी “ भारत शासन अधिनियम, १९३५ याच्या कलम २९६ (२) अन्वये रचना करण्यात आलेल्या न्यायाधिकरणाकडे ” हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**नोटीशीतील मजकूर.—** अशा बाबतीत काढलेल्या नोटिशीत जी चौकशी करावयाचा इरादा असेल तिचे स्वरूप निर्दिष्ट केलेले असेल आणि वर सांगितल्याप्रमाणे माफ ठरविलेल्या किंवा ज्या माफ ठरविल्या आहेत असा दावा असेल अशा माफ जमिनी किंवा हितसंबंध यांचा जो मालक आहे असे सांगण्यात येत असेल त्या इसमास, त्याने जातीने किंवा अधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत, विशिष्ट जागी व विशिष्ट मुदतीत (अशी मुदत कोणत्याही बाबतीत नोटीस बजाविण्यात आल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांपेक्षा कमी नसेल) वर सांगितल्याप्रमाणे माफ असलेल्या जमिनी किंवा हितसंबंध धारण करण्याविषयी त्यास असलेल्या हक्कांचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी आणि हक्क सिद्ध करण्यासाठी असलेला पुरावा हजर करण्यासाठी उपस्थित राहण्यास अशा नोटिशीअन्वये भाग पाडले पाहिजे.

नोटिशीत आणखी असेही स्पष्ट करण्यात येईल की, नोटिशीच्या अटींचे पालन करण्यातील कसुरीमुळे, अशी नोटीस ज्यासंबंधी असेल ती जागा किंवा हितसंबंध जप्त केला जाण्यास पात्र होईल.

६. **नोटीस बजावणे.—** उक्त नोटीस, वर सांगितल्याप्रमाणे माफ असलेली जमीन किंवा हितसंबंध धारण करणाऱ्या किंवा धारण करीत असल्याचा दावा सांगणाऱ्या पक्षकारावर बजाविण्यात येईल किंवा त्याची राहण्याची जागा माहीत नसेल तर त्याच्या बाजूने काम करणाऱ्या व्यक्ती किंवा अशा व्यक्तीच्या अभावी उक्त जमीन किंवा हितसंबंध ज्याच्या स्वाधीन असेल अशा व्यक्तीवर बजाविण्यात येईल.

७. **जमीन धारण करणारी व्यक्ती न आढळेल, तेव्हा नोटीस लावून ठेवणे.—** अशा व्यक्ती आढळणे शक्य नसेल तर, जिल्ह्याच्या एतद्देशीय महसूल अधिकाऱ्याच्या कार्यालयात आणि जीसंबंधी चौकशी चालू असेल अशी जमीन किंवा हितसंबंध ज्यात असेल त्या गावांच्या चावडीत किंवा जास्तीत जास्त सार्वजनिक ठिकाणी नोटीस लावण्यात येईल आणि मालक असल्याचा दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने आपला हक्क सिध्द करण्यासाठी, नोटिशीच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत जातीने किंवा आपल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास अशा नोटीशीअन्वये उक्त जमीन किंवा हितसंबंध जप्त केला जाण्याच्या शास्तीस पात्र ठेवून भाग पाडले पाहिजे आणि दावा सांगणारी व्यक्ती हजर होण्यात कसूर करील तर. उक्त जमीन किंवा हितसंबंध जप्त केला जाण्यास पात्र होईल.

८. **जप्तीची अंमलबजावणी कोणी करावी.—** नियम ५ व ७ यांत तरतूद केलेल्या जप्तीची अंमलबजावणी, अशी जप्तीच्या जमिनीसंबंधी असेल ती जमीन ज्यात असेल त्या जिल्ह्याचा कलेक्टर किंवा मुख्य महसूल प्राधिकारी याने, इनाम कमिशनर किंवा त्याचा सहाय्यक याच्या लेखी मागणीवरून केली पाहिजे. अशी मागणी ही, कलेक्टर यास जमीन जप्त करण्यास आणि जप्तीच्या मुदतीत अशा जमिनीपासून सरकार खाती जमा होणारा खंड वसूल करण्यास पुरेसे अधिकारपत्र असेल.

**९. विवरणपत्रक स्वीकारल्यानंतर आणि हक्काचा पुरावा घेतल्यानंतर कार्यरीती.—** प्रत्येक जिल्ह्यातील विवरणपत्रक स्वीकारल्यानंतर व त्याच्या समर्थनार्थ असलेला पुरावा घेतल्यानंतर, सरकारी जमाखर्चातील व राज्याच्या कागदपत्रातील नोंदीवरून आणि मिळण्यासारखा असेल त्या इतर कोणत्याही पुराव्यावरून मग तो सरकारला अनुकूल असो किंवा दावा सांगणाऱ्या व्यक्तींना अनुकूल असो — उक्त विवरणपत्रकांची तपासणी करण्यात येईल आणि त्यानंतर उक्त विवरणपत्रकांवर जमिनींची पूर्ण किंवा अंशत: आकारणी चालू ठेवण्याविषयी किंवा चालू करण्याविषयी निर्णय देण्यात येतील.

**१०. नोटिशीअन्वये हजर करणे अशक्य झाल्यास कार्यरीती.—** कलमे ५ व ७ यात तरतूद केलेल्या नोटिसांअन्वये, अशा नोटिसा ज्यांच्या नावाच्या होत्या त्या व्यक्तीस हजर करणे अशक्य झाल्याच्या आणि दावा सांगणारी कोणीही व्यक्ती त्याच्या दाव्याचे कामकाज चालविण्यास हजर न राहिल्याच्या बाबतीत कमिशनर किंवा सहायक कमिशनर हा मिळत असेल किंवा मिळण्यासारखा असेल अशा पुराव्यावरून प्रकरणाच्या वस्तुस्थतीची खात्री करून घेईल आणि त्यावर नोटिसा ज्यासंबंधी होत्या त्या जमिनीविषयी किंवा हितसंबंधाविषयी त्याला न्याय्य वाटेल असा निर्णय देईल.

**११. जप्ती रद्द करणे, जमा केलेला खंड मालकांस परत करणे.—** नियम ८ अन्वये अंमलबजावणी करून केलेली जप्ती, ज्याने केली होती त्या कलेक्टरने किंवा मुख्य महसूल प्राधिकाऱ्याने, इनाम कमिशनर किंवा त्यांचा सहाय्यक याकडून त्याचे मते उक्त जप्ती यापुढे आवश्यक नाही असे प्रमाणित करणारे निवेदन मिळाल्यावर, ती रद्द केली पाहिजे; परंतु [१][ [२][राज्य] सरकारच्या ] सामान्य किंवा विशेष अनुदेशांअन्वये असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही बाबतीत, जमीन जप्त केल्याच्या मुदतीत तिच्याबद्दल वसूल केलेला खंड आपण मालक आहे असे सांगणाऱ्या व्यक्तीस परत करता कामा नये.

**१२. निर्णयाच्या प्रती दावा सांगणाऱ्या व्यक्तींच्या स्वाधीन करणे.—त्यांच्या अनुपस्थितीत दिलेल्या निर्णयांच्या प्रतींची व्यवस्था कशी लावावी ते.—** नियम ९ च्या तरतुदींन्वये दिलेल्या निर्णयांच्या प्रमाणित प्रती, प्रत्येक निर्णय देण्यांत आल्यावर शक्य तितक्या लवकर ज्यांच्या दाव्यावर निर्णय देण्यात आला असेल त्या व्यक्तींच्या किंवा त्याच्या अभिकर्त्याच्या स्वाधीन करण्यात येतील आणि दावा सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तींच्या गैरहजेरीत नियम १० अनुसार देण्यात आलेल्या सर्व निर्णयाच्या प्रती, निर्णय ज्या जमिनीसंबंधी असेल

---

१. भारतीय विधिअनुकूलन परिषद आदेशयाद्वारे, सरकारच्या या मजकुराऐवजी "प्रातिक सरकारच्या" हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूल आदेश १९५० द्वारे "प्रातिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

त्या जमिनी ज्या तालुक्यात असतील त्या तालुक्याचा मामलतदार किंवा इतर महसूल व्यवस्थापक यास पाठविण्यात येतील आणि त्याने त्या प्रती, अशा प्रतीमुळे ज्यांच्या हितसंबंधास बाध येत असेल ते पक्षकार आढळण्याजोगे असल्यास त्यांच्या स्वाधीन केल्या पाहिजेत किंवा अन्यथा अशा प्रती, वादास्पद जमिनी ज्या गावात असतील तशा गावांत सार्वजनिकरीत्या लावून ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**१३. निर्णय अंमलात आणणे.—** या अधिनियमितीअन्वये दिलेल्या कोणत्याही जमिनी किंवा त्यातील हितसंबंध यांच्याशी संबंधित असलेले निर्णय, ज्या जमिनींच्या संबंधात ते असतील अशा जमिनी ज्या जिल्ह्यात असतील त्या जिल्ह्याच्या कलेक्टरने किंवा मुख्य महसूल प्राधिकाऱ्याने, इनाम कमिशनर किंवा त्यांचा सहाय्यक याच्या मागणीवरून [१] [ [२] [राज्य] सरकारकडून ] वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा कोणत्याही रीतीने अंमलांत आणले पाहिजेत.

**१४. अपिलाची कार्यरीती हुकुमनामे रद्द करणे.—** इनाम कमिशनर किंवा त्याचे सहाय्यक यांच्या कोणत्याही निर्णयाविरुध्द निर्णयाविरुध्द अपील करण्याची एखाद्या व्यक्तींची इच्छा असेल अशा सर्व बाबतीत, तो नियम २ अन्वये त्याच्या अपीलाची ज्या प्राधिकाऱ्याकडून दखल घेतली जाऊ शकत असेल अशा प्राधिकाऱ्यांच्या नावे विनंती अर्ज करून अर्ज करील. असा विनंतीअर्ज ज्याविरुध्द अपील असेल अशा हुकूमनाम्याच्या तारखेपासून शंभर दिवसांच्या आत केला पाहिजे. उक्त हुकुमनाम्याची प्रत अपिलाच्या विनंती अर्जासोबत असली पाहिजे आणि अशारितीने जे कोणतेही अपील करण्यात आले नसेल ते योग्य मुदतीत करण्यात न आल्याबद्दल योग्य व आवश्यक कारण असल्याच्या पुराव्याशिवाय दाखल करून घेता कामा नये आणि याद्वारे अशी तरतूद करण्यात येत आहे की, इनाम कमिशनरने किंवा त्याच्या सहाय्यकापैकी कोणीही दिलेला कोणताही निर्णय, कामकाज रीतसरपणाचा अभाव असल्यामुळे रद्द केला जाण्यास पात्र नसेल परंतु निर्णयांच्या न्याय्यतेवर परिणाम करणाऱ्या बाबीसाठीच तो रद्द करण्यास पात्र असेल.

## अनुसूची ब

इनाम किंवा जमीन महसूल देण्याची माफी असल्याचा दावा सांगण्यांत येणाऱ्या इस्टेटींच्या हक्कांबाबत न्यायनिर्णय करण्याविषयी नियम.

**१. अगोदर कायम म्हणून जाहीर केलेल्या इनामे चालू राहणे.—** ब्रिटिश सरकारने किंवा त्याखाली काम करणाऱ्या कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याने केलेल्या, अशा जाहीरनाम्याअन्वये

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

धारण केलेल्या जमिनी, त्यास जमीन महसूल देण्याची पूर्णतः किंवा अंशतः माफी राहून वंशपरंपरा किंवा कायमच्या धारण करण्याचे चालू राहतील अशा विवक्षित आणि अनिर्बंध जाहीरनाम्याअन्वये धारण केलेल्या सर्व जमिनी अशा जाहीरनाम्याच्या आशयास अनुसरून अशारीतीने चालू राहावयाच्या आहेत.

परंतुक १. **जाहीरनामा करण्यासाठी सक्षमतेविषयी प्रश्नाला निकालात काढणे.—** वर सांगितल्याप्रमाणे असलेला जाहीरनामा करण्यासाठी किंवा देण्यासाठी अधिकाऱ्यास असलेल्या क्षमतेसंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, कमिशनर किंवा सहाय्यक कमिशनर याने त्यांचा निर्णय अनिर्णित ठेवावा आणि प्रकरणाची परिस्थिती [1][ [2] [राज्य] सरकारकडे ] कळवावी [2][ ज्याच्याकडे ] याद्वारे असा अधिकारी, असा जाहिरनामा करण्यास किंवा देण्यास सक्षम होता की नाही हे ठरविण्याचा अधिकार राखून ठेवण्यात येत आहे व कमिशनर किंवा त्याचा सहाय्यक याने, [3][ [2] [राज्य] सरकारचा ] निर्णय मिळाल्यानंतर, त्यास अनुसरून निर्णय दिला पाहिजे.

**२. सक्षम प्राधिकाऱ्याने सनद दिलेली असेल त्या बाबतीत, जमीन वंशपरंपरा असल्याचे जाहीर करणाऱ्या सनदेखालील जमीन धारण करण्याचे चालू राहणे.—** जमीन वंशपरंपरा असल्याचे जाहीर करणाऱ्या सनदेअन्वये धारण केलेली सर्व जमीन, सनदेच्या शर्ती अन्वये अशारीतीने चालू राहील.

परंतुक १. परंतु, अशी सनद सरकारी महसूल कायम दुसऱ्याच्या नावे करून देण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून करण्यात किंवा विशेषः मान्य करण्यात आली असेल तर, त्या मान्यतेचा आणि क्षमतेचा प्रश्न [4][ [2] [राज्य] सरकारकडे ] लिहून पाठवावा आणि [4][ [2] [राज्य] सरकारने ] नियम १ याअन्वये विहित केलेल्या रीतीने निर्णय करावा.

परंतुक २. **आणि सत्ताप्रकाराच्या अधी विधिनुसार पाळावयाच्या असतील.—** तसेच, सत्ताप्रकाराच्या अटींत, देशाचे कायदे किंवा सार्वजनिक सभ्यतेचे नियम यांचा भंग केल्यावाचून ते पाळता येणार नाहीत अशी कोणतीही तरतूद असता कामा नये.

परंतुक ३. **आणि सनद रद्द न करणे किंवा तीत फेरफार न करणे.—** तसेच, अशी सनद त्यानंतर (सक्षम प्राधिकाऱ्याने ) रद्द किंवा नामंजूर करण्यात आली नसली पाहिजे किंवा त्या सनदेच्या शर्तीत कोणतीही बदल करण्याचा आदेश दिलेला असता कामा नये किंवा

---

१. भारतीय विधि अनुकूलन आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूल आदेश १९५० द्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील आदेशाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

असा बदल मान्य केलेला असता कामा नये.

**३. ब्रिटिश राज्यापूर्वी ६० वर्षे माफ किंवा अंशतः माफ असलेल्या जमिनी धारण करण्याचे चालू राहणे.—** ब्रिटिशशासनाच्या प्रारंभापूर्वी साठ वर्षाच्या मुदतीसाठी आकारणी पूर्णतः किंवा अंशतः माफ असलेल्या म्हणून अखंडितपणे धारण केलेल्या आणि नंतर सनद प्रथम ज्यास देण्यात आली होती त्या व्यक्तींच्या पुरुषवंश क्रमांतील नातू किंवा अशा नातवाचा पुरुष वारस असलेल्या व्यक्तींच्या अनधिकृत ताब्यांत असलेल्या सर्व जमिनी, ब्रिटिश शासनाच्या प्रारंभाच्या वेळी जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीपासून आपला वंशक्रम पुरुषवारसा मार्फत सांगून, अशा व्यक्तीचा कोणताही पुरुष वारस अस्तित्वांत असेल तोपर्यंत अशारितीने धारण करण्याचे चालू राहील.

**४. अशा रीतीने चाळीस वर्षे माफ असलेल्या जमिनी धारण करण्याचे चालू राहणे.—** ब्रिटिश शासनाच्या प्रारंभापूर्वी चाळीस वर्षांच्या मुदतीत आकारणी पूर्णतः किंवा अंशतः माफ असलेल्या म्हणून अखंडितपणे धारण केलेल्या आणि नंतर, सनद प्रथम ज्यास देण्यात आली होती त्या व्यक्तींच्या मुलगा किंवा मुलाचा पुरुष वारस असलेला पुरुष वारस यांच्या अधिकृत ताब्यात असलेल्या सर्व जमिनी, ब्रिटिश शासनाच्या प्रारंभाच्यावेळी जमीन धारण करणाऱ्या व्यक्तीनंतर आणखी एका पिढीपर्यंत अर्थात् त्यांच्या मुलांपैकी सर्वात जास्त जाणाऱ्या मुलांच्या मुत्यूपर्यत चालू राहतील.

परंतुक १. **अधिकृत ताबा कसा सिध्द करावा.—** नियम ३ व ४ यांत अपेक्षित असलेला अधिकृत ताबा यांत, सरकार किंवा सर्वोच्च सत्ता याकडून मिळविण्यात आले असेल असे कोणतीही विशिष्ट अधिकारपत्र किंवा सरकारची किंवा सर्वोच्च सत्तेची मान्यता असल्याचे सिध्द करण्याचा समावेश होत नाही. जिल्हा अधिकाऱ्याच्या खऱ्याखुऱ्या हिशोबात (त्या त्यावेळी असलेल्या सरकारने न तपासलेल्या किंवा मंजुरी न दिलेल्या हिशोबांत सुध्दा) चालू राहिलेली उक्त जमिनीची केवळ नोंद सुध्दा, अशी जमीन या नियमाच्या कारणांच्या संबंधात " अखंडित " व " अधिकृत " या सदराखाली येण्यास पुरेशी असेल परंतु, कलेक्टरच्या कचेरीतील कोणत्याही नोंदी, वर सांगितल्याप्रमाणे माफ असलेल्या अशा जमिनी धारण करणे हे सरकारने किंवा सर्वोच्च सत्तेने अनधिकृत ठरविले असल्याचे दर्शविणाऱ्या असता कामा नयेत.

परंतुक २. **दावा सांगणाऱ्या व्यक्तीचा कायम अधिकार केव्हा मान्य करण्याजोगा असेल.—** दावा सांगणाऱ्या व्यक्तींच्या जमिनीचा उपयोग नियम ३ व ४ च्या शर्तीचे पालन करण्यासाठी क्रमशः आवश्यक असतील इतकी वर्षे आणि पिढ्या चालू आहे अशा त्याच्या म्हणण्याचे खंडन करण्यास पुरावा नसेल तर, त्याचा कायम हक्क मान्य करण्यात आला पाहिजे.

परंतुक ३. **ब्रिटिश शासनाचा आरंभ पूर्वी पेशव्यांच्या असलेल्या प्रदेशात केव्हा होतो.—** ब्रिटिश शासनाचा आरंभ, ज्या काळी ईस्ट इंडिया कंपनी प्रत्येक जिल्ह्यात त्यातील इनामांच्या संबंधात सरकार किंवा सर्वोच्च अधिकारी झाली त्या काळापासून समजावयाचा आहे. म्हणून पेशव्यांनी स्वाधीन केलेले किंवा त्यांच्यापासून जिकलेले प्रदेश यांत, मग ते इनाम वगैरे वगळून धारण केलेले खालसत महाल किंवा सरजाम वगैरे असोत, ब्रिटिश

शासनाचा आरंभ, पेशव्यांच्या शासनाच्या अखेरीपासून होतो.

**पेशव्याच्या शासनाहून पूर्वीचे असेल अशा स्वतंत्र मांडलिक राज्यांत किंवा जहागिरीत केव्हा होता.—** परंतु, पेशव्याच्या शासनाहून पूर्वीचे असेल आणि ज्यांच्या इनामांवर त्याने कोणताही अधिकार सांगितला नव्हता असे स्वतंत्र मांडलिक राज्य किंवा जहागीर खालसा झाली असेल त्या बाबतीत, ब्रिटिश शासनाचा आरंभ हा, ज्या तारखेस जिल्ह्यांची सामान्य व्यवस्था कंपनीच्या हाती आली असेल त्या तारखेपासूनच झाला असे समजण्यात आले पाहिजे;

**ईस्ट इंडिया कंपनीने राज्य संपादन केल्याच्या तारखेसंबंधी प्रश्नाचा निकाल.—** आणि ज्या तारखेस ईस्ट इंडिया कंपनी कोणत्याही जिल्ह्याचे सरकार झाली किंवा कोणत्याही जिल्ह्याची सामान्य व्यवस्था तिच्या हाती आली त्या नक्की तारखेविषयी कोणताही प्रश्न उदभवेल त्याप्रसंगी, असा प्रश्न नियम १, परंतुक १ याद्वारे विहित केलेल्या रीतीने [१][ [२] [राज्य] सरकारकडे ] लिहून पाठविला पाहिजे [१][ [२] [राज्य] सरकारकडून त्याचा निर्णय देण्यात आला पाहिजे.

[३]**६. जमीन, ती धारण करणाऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर परत घेता येईल.—** महसूल देण्याची पूर्णत: माफी असलेली जमीन म्हणून किंवा अंशत: आकारणीवर धारण केलेली आणि जिचा ताबा पूर्वीच्या नियमान्वये चालू ठेवता येत नाही अशी जमीन, ती धारण करणाऱ्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर परत घ्यावयाची असेल.

परंतुक १. **जमीन धारण करणारी जी व्यक्ती ब्रिटिश राजवटीपूर्वीमरण पावला असेल ती जमीन आजीव सत्ताप्रकाराने धारण करता येईल.—** ब्रिटिश शासनाच्या आरंभाच्या काळी जमीन धारण करणारी व्यक्ती मरण पावली असेल त्याबाबतीत, उघड उघड कोणतीही लबाडी नसेल किंवा सवलत बंद करण्यासाठी इतर कोणतेही कारण नसेल तर, ती जमीन आजन्म धारण करण्याची परवानगी, ज्यावेळी चौकशीस सुरुवात झाली त्यावेळी ती त्यांच्या नावावर चालू होती त्या व्यक्तींच्या नावे चालू ठेवता येईल.

परंतुक **२. लबाडीने धारण केलेली जमीन परत घेणे.—** जमीन, नुकत्याच केलेल्या उघड लबाडीने (जसें, पूर्वीच्या शासनाने परत घेतलेल्या इनामाचा हल्लीच्या शासनाखाली अधिकारावाचून परत भोगवटा करण्यात आला असेल तेव्हा किंवा हल्लीच्या शासनाच्या आरंभापासून, जिल्हा अधिकारी किंवा गाव कामगार यांच्या मूकसंमतीने एखादे बनावट इनाम निर्माण झाले असेल तेव्हा) धारण केली असेल तेव्हा, ती ह्या किंवा वरीलपैकी कोणत्याही

१. भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "प्रातिक सरकारकडे/सरकारकडून" हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूल आदेश १९५० द्वारे "प्रातिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. ५ क्रमांकाचा नियम नाही.

नियमाअन्वये चालू ठेवण्याजोगी जमीन नसल्यास ताबडतोब परत घेण्यात येईल.

**७. मशिदी, देवळे इत्यादीसाठी असलेल्या जमिनी चालू ठेवणे**.— मशिदी, देवळे किंवा ज्यांच्या कायमपणाबद्दल कोणताही संशय नसेल अशा तत्सम संस्था यांसाठी धारण केलेल्या सर्व जमिनी, त्या देण्यात आल्या त्यावेळी त्या कायम चालू राहण्याविषयी स्पष्टपणे तरतूद केलेली नसली तरीही चालू ठेवण्यात आल्या पाहिजेत.

परंतुक **१, २ व ३. नियम २ मधील तत्सम तरतूदी लागू असणे**.— तसेच ज्या बाबतीत, मूळ सनद ज्या परिस्थितीत देण्यात आली परिस्थिती किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने तिला दिलेली स्पष्ट मान्यता सिध्द करणारे मालकी हक्काचे कागदपत्र असतील तर ह्या अनुसूचीच्या नियम २ मधील तत्सम तरतूदी त्याचप्रमाणे लागू होतील.

परंतुक **४. सनदेविषयी कोणताही पुरावा मिळत नसेल त्याबाबतीत चाळीस वर्षे उपभोग घेतल्याचा परिणाम**.— ह्या नियमांच्या तरतुदींखाली येणारे इनाम देण्यात आले होते किंवा नाही अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने स्पष्ट मान्यता दिली होती किंवा नव्हती याविषयी कोणताही पुरावा मिळत नसेल तर ते इनाम हल्लींच्या शासनाच्या आरंभापूर्वी चाळीस वर्षे मुदतीत निर्विवाद उपभोगण्यात आले असेल तर ते कायम चालू ठेवण्यात येईल आणि जिल्हा अधिकाऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या हिशोबात (त्या त्यावेळी सरकारने मंजूर न केलेल्या हिशोबातसुध्दा) चालू राहिलेल्या इसमाच्या केवळ नोंदीमुळे सिध्द झालेला उपभोग, असे इनाम सरकारने अनधिकृत ठरविले असल्याचे दर्शविणाऱ्या कोणत्याही नोंदी सरकारी हिशोबात नसल्या तरी ही या तरतुदींचा फायदा एखाद्या इनामास देण्यासाठी पुरेसा "अखंडीत" उपयोग आहे असे समजण्यात आले पाहिजे.

परंतुक **५. कागदपत्र चाळीस वर्षे मुदतीपर्यंत उपभोग सिध्द करण्यास पुरेसे होईल इतके जुने नसतील त्याबाबतीत कायम अधिकार केव्हा देता येतील.—** मिळणारा पुरावा अशा इनामांत पूर्णपणे कायम अधिकार प्रस्थापित करण्यासाठी परंतुक ४ यात अपेक्षित असलेल्या मुदतीत तिका उपयोग असल्याचे सिध्द करण्यास पुरेसे होईल इतक्या मागील तसेल तर, तो जितक्या मागील असेल तेथवर पुरेसा उपयोग आहे या दावा सांगणाऱ्या व्यक्तींच्या म्हणण्याविरुध्द नसल्यास, त्या इसमाविषयीचा कायम अधिकार, त्याचे म्हणणे सोडून काढण्यासाठी इतर पुरावा मिळत नसल्यास, त्याच्या म्हणण्यानुसार मान्य करण्यात आला पाहिजे.

परंतुक **६. नियम केव्हा लागू करण्याजोगा नसेल.—** ह्या नियमांचे विशिष्ट फायदे, पूजा-अर्चा करण्यासाठी व्यक्तींनी आपल्या स्वतःच्या नावावर धारण केलेल्या जमिनीस मिळणार नाहीत. आणि अशा जमिनीबाबतच्या दाव्याचा निर्णय वैयक्तिक इनामासाठीच्या नियमान्वये करण्यात आला पाहिजे.

 परंतुक **७. नियमाखाली येणाऱ्या काही दाव्यांचा न्यायनिर्णय.—** ह्या नियमाखाली

येणाऱ्या स्वरूपाच्या दाव्यास मूळ वैध हक्काचा पुरावा मिळत नसल्याचे आढळून येईल आणि ते पुरेशा कायम उपभोगाशिवाय असल्याचे सिद्ध होईल तेव्हा, त्यांचा नियम ६ अनुसार न्यायनिर्णय करण्यात आला पाहिजे.

**८. कामाच्या नात्याने असलेल्या सत्ताप्रकाराने धारण केलेली जमीन वंशपरमपरेने चालू राहणे.—** जो स्थानिक वहिवाटीवरून वंशपरंपरा असल्याचे स्पष्ट असेल अशा कामाच्या नात्याने असलेल्या सत्ताप्रकाराने अधिकृतरित्या धारण केलेल्या आणि तसे जाहीर करणाऱ्या सनदा. उदाहरणार्थ—काजी, गावजोशी, वगैरे यासारख्या कोणत्याही वंशपरंपरेच्या जागेचा सरकारी मेहनतांना असणारी आणि केवळ वैयक्तिक नसणारी इनामे—नसतील तरीही तरतूद आजतागायत तसे समजण्यात आले आहेत अशा सर्व जमीनी कायम चालू राहावयाच्या असतील.

परंतुक १, २ व ३. **नियम २ चा तत्सम तरतूद लागू असणे.—** या बाबतीत मूळ सनदेची परिस्थिती किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने तिला दिलेली स्पष्ट मान्यता सिध्द करणारे मालकी हक्काचे कागदपत्र किंवा इतर कागदपत्र असतील त्याबाबतीत, ह्या अनुसूचीच्या नियम २ च्या तत्सम तरतुदी त्याचप्रमाणे लागू असतील.

परंतुक **४. सनद किंवा मान्यता सिद्ध झाली नसली तरी ही पुरावा ज्या मुदतीसाठी असेल त्या मुदतीत कामाच्या नात्याने असलेल्या सत्ताप्रकाराने उपभोगलेले इनाम चालू राहणे.—** ह्या नियमाच्या तरतुदीखाली येणारे निम देण्यात आले होते किंवा नाही अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने स्पष्ट मान्यता दिली होती किंवा नव्हती याविषयी कोणताही पुरावा मिळत नसेल त्याबाबतीत, सर्वात आधीच्या ज्या मुदतीच्या संबंधात पुरावा मिळत असेल त्या मुदतीपासून कामाच्या नात्याने म्हणून आणि केवळ वैयक्तिक म्हणून नव्हे—धारण केलेली जमीन म्हणून त्याचा निर्विवाद उपयोग असेल तर ते इनाम, दावा सांगणाऱ्या व्यक्तीच्या स्वतःच्या निवेदनामुळे तसे करणे अयोग्य न झाल्यास, सरकारी मेहनताना म्हणून चालू ठेवण्यात येईल.

परंतुक **५. राज्याच्या विवक्षित सेवेच्या उपलब्धीस नियमांची माफी देणे.—** ह्या नियमाच्या तरतुदी राज्याकडे केलेल्या नोकरीबद्दल देसाई, सरदेसाई, नाडगौडा देशपांडे, पाटील, कुलकर्णी, महार तलवार यांची चाकरी इनामे म्हणून चालू ठेवलेल्या मेहनतान्यास कोणत्याही प्रकारे लागू होणार नाहीत आणि त्याचे दावे, अशा जमिनीच्या नियमनासाठी प्रस्तावित केले असतील किंवा करण्यात येतील त्या नियमानुसार निकालात काढले पाहिजेत.

परंतुक **६. जमिनीच्या उपभोगाच्या केवळ मुदतीमुळे नियमांचा फायदा मिळण्याचा हक्क नसणे.—** एखादी सरकारी व्यक्ती इनाम म्हणून केलेल्या जमिनीच्या उपभोगाची केवळ मुदत एखादा हक्क या नियमाखाली आणला जाण्याचा हक्क मिळण्यास पुरेशी नाही असे समजण्यात आले पाहिजे.

परंतुक **७. मागील नियमांचा फायदा केव्हा मिळण्यासारखा असेल.—** ह्या नियमाअन्वये जी बाबत दावा सांगितला आहे अशी जमीन प्रस्तुत नियमान्वये कायम चालू ठेवण्याजोगी न आढळल्यास, दावा सांगणाऱ्या व्यक्तीस, त्याच्या बाबतीत लागू असतील अशा ह्या अनुसूचीतील मागील नियमांपैकी कोणत्याही नियमाचा फायदा देण्यात येईल.

**९. परत घेतलेली जमीन शेवटी ज्या व्यक्ती धारण करतील त्यांच्या विधवांसाठी तरतूद.—** ह्या अनुसूचीच्या नियमाअन्वये कोणतीही जमीन परत घेण्यात आल्यावर, त्या धारण करणाऱ्या शेवटच्या व्यक्तींच्या विधवांना, गरिबी व निराश्रित असल्याचे सिध्द झाल्याच्या बाबतीत, अर्धा किंवा इतर हिस्सा चालू ठेवण्याचा अधिकार आहे.

परंतुक **१. वंशपरंपरा असलेले वैयक्तिक इनाम, ते धारण करणाऱ्या व्यक्तीची विधवा व एकमेव वारस याकडे चालू ठेवणे.—** वंशपरंपरा असलेले वैयक्तिक इनाम म्हणून जी जमीन मान्य करण्याजोगी असेल त्या जमिनीच्या बाबतीत, ज्यास जिवंत मुलगा किंवा इनाम अनिवार्यतः ज्याकडे जाईल असे इतर वारस नसतील असा जमीन मालक मरण पावल्यास त्याची विधवा स्त्री हक्काने त्याचा एकमेव वारस असेल आणि ती जिवंत असेपर्यंत, इनाम [१][ बादशहाकडे ] जप्त झाले आहे असे समजता येणार नाही. म्हणून, ते विधवा स्त्री जिवंत असेपर्यंत कमी न होता चालू रहावे.

**१०. विवक्षित सत्ताप्रकार, हे नियम लागू करण्यापासून वगळावे.—** हे नियम जहागिऱ्या, सरंजामे किंवा [२][सरकारच्या] सेवेबद्दल इतर सत्ताप्रकार किंवा राजकीय स्वरुपाचे सत्ताप्रकार यास लागू असण्याची आवश्यकता नाही आणि त्यावरील हक्क व ते चालू ठेवणे हे आजतागायत होते त्याप्रमाणे [३][ [४][राज्य] सरकारला ] वेळोवेळी जे नियम करणे आवश्यक वाटेल अशा नियमान्वये ठरविण्यात आले पाहिजे.

**११. दावा सांगणाऱ्या व्यक्तींसाठी नियमांत फेरफार करणे आणि त्यांचा अर्थ लावणे.—** ह्या नियमापैकी कोणतेही नियम, जे दावे सांगत असतील अशा व्यक्तीं [१][ [४][राज्य] सरकारच्या ] अनुदेशान्वये शिथिल करण्याचा अधिकार आहे [२][ज्याच्याकडे] ह्या नियमांपैकी ज्या कोणत्याही नियमांच्या संबंधात प्रश्न उद्‌भवेल त्याचा नक्की अर्थ लावण्याचा अधिकार देखील विहीत करण्यात येईल.

---

१. भारतीय विधि अनुकूलन आदेशाद्वारे ''सरकारकडे'' या मजकुराऐवजी ''बादशहांकडे'' हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. विधि अनुकूल आदेश १९५० द्वारे ''बादशाहांच्या'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे ''सरकारला'' या मजकुराऐवजी ''प्रातिक सरकारला'' हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. विधि अनुकूल आदेश १९५० याद्वारे ''प्रातिक'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१. विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. वरील आदेशाद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे - ४११ ००६.

S (J) 431

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**विधि व न्याय विभाग**

## (सन १८५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११)

# मुंबईचा जमीन महसूल माफ असलेल्या इस्टेटींबाबत अधिनियम, १९५२

**( ३० जून २००८ पर्यंत सुधारित )**

## (Bombay Act No. XI of 1852)

# ( The Bombay Rent - Free Estates Act 1852 )

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६
यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि

संचालक, शासन मुद्रण व लेखन सामग्री विभाग, महाराष्ट्र राज्य,
मुंबई - ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२०११

**[ किंमत : ६ रुपये ]**

S (J) 431

**THE BOMBAY RENT-FREE ESTATES ACT, 1852**
(BOMBAY 11 OF 1852)

# मुंबईचा जमीन महसूल माफ असलेल्या इस्टेटींबाबत अधिनियम, १९५२

---

## अनुक्रमणिका


| उद्देशिका | | पृष्ठ |
|---|---|---|
| कलमे | | |
| १. | [ निरसित केले ] ... ... ... | ५५ |
| २. | इनाम कमिशनर सहाय्यक व नोकर याची नेमणूक करण्याचा अधिकार | ५५ |
| ३. | कर्तव्ये कशी पार पाडण्यात येतील ते ... ... | ५५ |
| ४. | माफी मिळविण्यासाठी दावेदाराचे स्वामित्व ठरविणे ... | ५५ |
| ५. | साक्षीदारांसह हजर राहण्यास भाग पाडणे, पुरावा घेणे, इत्यादीबाबत अधिकार. | ५६ |
| | कमिशनर व सहाय्यक यांच्या कामकाजाविरूध्द तक्रारी किंवा त्यावर अपीले. | ५६ |
| ६. | कमिशनवर काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या गैरवर्तणूकीबद्दल शिक्षा ... | ५६ |
| | जुलयाने बक्षीस घेणे या संज्ञेची व्याख्या ... ... | ५६ |
| | इतर खटला चालविण्यावर निर्बंध नसणे ... ... | ५६ |
| ७. | निरक्षित केले ... ... ... | ५६ |


**अनुसूची अ**

प्रत्येक इनाम कमिशनर व त्याचे सहाय्यक याची कर्तव्ये
ठरविण्याबाबत नियम


| नियम. | | |
|---|---|---|
| ७. | निरक्षित केले ... ... ... | ५६ |
| १. | कर्तव्ये ठरविणे ... ... | ५७ |
| २. | सहाय्यक कमिशनर व कमिशनर यांच्या आदेशावर अपील ... | ५७ |
| ३. | हक्कांची विवरणपत्रके स्वीकारण्याचे व विवरणपत्रकांच्या समर्थनार्थ असलेला पुरावा नोंदविण्याचे कर्तव्य. | ५७ |
| ४. | विवरणपत्रके कशी स्वीकारण्यांत येतील ... ... | ५७ |
| ५. | नोटीस केव्हा काढावी ... ... ... | ५७ |
| | नोटिशींतील मजकूर ... ... ... | ५८ |
| ६. | नोटीस बजावणे ... ... ... | ५८ |
| ७. | जमीन धारण करणारी व्यक्तीं न आढळेल तेव्हा नोटीस लावून ठेवणे | ५८ |
| ८. | जप्तीची अंमलबजावणी कोणी करावी ... ... | ५८ |

## **अनुसूची–अ**–चालू


पृष्ठ

९. विवरणपत्रके स्वीकारल्यानंतर आणि हक्काचा पुरावा घेतल्यानंतर ५९

१०. नोटिशीअन्वये हजर करणे अशक्य झाल्यास कार्यरीती ... ५९

११. जप्ती रद्द करणे. जमा केलेला खंड मालकांस परत करणे ... ५९

१२. निर्णयाच्या प्रती दावा सांगणाऱ्या व्यक्तींच्या स्वाधीन करणे. त्यांच्या अनुपस्थितींत दिलेल्या निर्णयाच्या प्रतींची व्यवस्था कशी लावावी ते ५९

१३. निर्णय अंमलात आणणे ... ... ५९

१४. अपिलाची कार्यरीती ... ... ५९

हुकुमनामे रद्द करणे ... ... ५९


## **अनुसूची ब**

इनाम किंवा जमीन महसूल देण्याची माफी असल्याचा दावा सांगण्यांत येणाऱ्या इस्टेटींच्या हक्कांबाबत न्यायनिर्णय करण्याविषयी नियम


नियम.

१. अगोदर कायम म्हणून जाहीर केलेली इनामेचे चालू राहणे ... ६०

जाहीरनामा करण्यासाठी सक्षमतेविषयीचे प्रश्न निकालात काढणे... ६०

२. सक्षम प्राधिकाऱ्याने सनद दिलेली असेल त्याबाबतीत जमीन वंशपरंपरा असल्याचे जाहीर करणाऱ्या सनदेखालील जमीनधारण करण्याचे राहणे; ६०

आणि सत्ताप्रकारच्या अटी विधिनुसार पाळावयाच्या असतील ... ६०

आणि सनद रद्द करणे, नामंजुर न करणे किंवा तीत फेरफार करणे ६०

३. ब्रिटिश राज्यापूर्वी साठ वर्षे माफ किंवा अंशतः माफ असलेल्या जमिनी धारण करण्याचे चालू राहणे. ६०

४. अशा रीतीने चाळीस वर्षे माफ असलेल्या जमिनी धारण करण्याचे चालू राहणे. ६१

अधिकृत ताबा कसा सिध्द करावा ... ... ६१

दावा सांगणाऱ्या व्यक्तीचा कायम अधिकार केव्हा मान्य करण्याजोगा असेल. ६१

५. ब्रिटिश शासनाचा आरंभ पूर्वी पेशवांच्या असलेल्या प्रदेशांत केव्हा होतो– ६१

पेशव्यांच्या शासनाहून पूर्वीचे असेल अशा स्वतंत्र मांडलिक राज्यांत किंवा जहागिरीत केव्हा होतो. ६१

ईस्ट इंडिया कंपनीने राज्य संपादन केल्याच्या तारखेसंबंधी प्रश्नांचा निकाल. ६१

| | | पृष्ठ |
|---|---|---|
| ६. | जमीन, ती धारण करणाऱ्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर परत घेता येईल... | ६१ |
| | जमीन धारण करणारा जी व्यक्ती ब्रिटिश राजवटीपूर्वी मरण पावली असेल ती जमीन आजीव सत्ताप्रकाराने धारण करता येईल. | ६२ |
| | लबाडीने धारण केलेली जमीन परत घेणे ... ... | ६२ |
| ७. | मशिदी, देवळे, इत्यादीसाठी असलेल्या जमिनी चालू राहणे ... | ६२ |
| | नियम २ मधील तत्सम तरतुदी लागू असणे ... ... | ६२ |
| | सनदेविषयी कोणताही पुरावा मिळत नसेल त्याबाबतीत चाळीस वर्षे उपभोग घेतल्याचा परिणाम. | ६२ |
| | कागदपत्र चाळीस वर्षे मुदतीपर्यंत उपभोग सिध्द करण्यास पुरेसे होईल इतके जुने नसतील त्याबाबतीत कायम अधिकार केव्हा देता येतील. | ६२ |
| | नियम केव्हा लागू करण्याजोगा नसेल ... ... | ६२ |
| | नियमाखाली येणाऱ्या काही दाव्यांचा न्यायनिर्णय ... ... | ६३ |
| नियम. | | |
| ८. | कामाच्या नात्याने असलेल्या सत्ताप्रकाराने धारण केलेली जमीन वंशपरंपरेने चालू राहणे. | ६३ |
| | नियम २ ची तत्सम तरतूद लागू अरणे ... ... | ६३ |
| | सनद किंवा मान्यता सिध्द झाली नसली तरीही, पुरावा ज्या मुदती-साठी असेल त्या मुदतीत कामाच्या नात्याने असलेल्या सत्ताप्रकाराने उपभोगलेले इनाम चालू राहणे. | |
| | राज्याच्या विवक्षित सेवेच्या उपलब्धी नियमांची माफी देणे ... | ६३ |
| | जमिनीच्या उपभोगाच्या केवळ मुदतीमुळे नियमांचा फायदा मिळण्याचा हक्क नसणे. | ६३ |
| | मागील नियमांचा फायदा केव्हा मिळण्यासारखा असेल ... | ६३ |
| ९. | परत घेतलेली जमीन शेवटी ज्या व्यक्ती धारण करतील त्यांच्या विधवांसाठी तरतूद वंशपरंपरा असलेले वैयक्तिक इनाम धारण करणाऱ्या व्यक्तीची विधवा व एकमेव वारस यांकडे चालू ठेवणे. | ६३ |
| १०. | विवक्षित सत्ताप्रकार, हे नियम लागू करण्यापासून वगळणे ... | ६४ |
| ११. | दावा सांगणाऱ्या व्यक्तीसाठी नियमांत फेरफार करणे आणि त्यांचा अर्थ लावणे. | ६४ |